# ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जि.पुणे

**ई - निविदा अंतर्गत खुली निविदा सूचना क्र.बी-०१/०३/२०२६-२७**

ग्रामपंचायत कुरुळी, तालुका खेड, जिल्हा पुणे, यांचे तर्फे योग्य त्या वर्गातील महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत पेस्ट कंट्रोल कामे करणारी कंत्राटदार / संस्था यांच्याकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाची ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फी रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे कुरुळी, ता.खेड येथे ग्रामपंचायतीस वर्षभराकरिता पेस्ट कंट्रोल साहित्य व सर्विस पुरविणे. | ५९०/- | ५,०००/- | १२ महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई - निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगनकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी, सूचना शुद्धीपत्रके इत्यादीची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) वरील कामांचे निविदा प्रपत्रे WWW.Mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करून देनेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती ई. संकेतस्थळावरून दि.13/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजलेपासून ते दि.29/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत अधिग्रहित करता येईल.

३) वरील कामांच्या निविदा WWW.Mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.13/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजलेपासून ते दि.29/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अधिग्रहित (download) करता येईल व ऑनलाईन पद्धतीने सादर करता येतील.

४) निविदा फी व इसारा रक्कम ऑनलाईन पद्धतीने सादर करणेची आहे त्याशिवाय सदर निविदाधारकाची निविदा वैध धरली जाणार नाही.

५) सदर कामाच्या निविदेबाबत खालील बाबी आवश्यक राहतील.

लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा)

**(A)** प्रत्येक कामाचे निविदापत्र डाऊनलोड केल्याची फी व ईसारा रक्कम वरील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे Online e- Payment पध्दतीने ने भरावी व स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

**(B)** महाराष्ट्र शासन यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र / शॉपअॅक्ट प्रमाणपत्राची प्रत स्कॅन करून अपलोड करावी लागेल. सदरच्या प्रमाणपत्रामध्ये वरील कामासंदर्भात उल्लेख असणे आवश्यक आहे.

**(C)** विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (Declaration) स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

**(D)** प्राप्तीकर PAN CARD तसेच मागील ३ चालु आर्थिक वर्षाचे ITR स्कॅन करून अपलोड करावे लागेल. (A. Y. 2022-23, 2023-24, 2024-25)

**(E)** GST Registration Certificate स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

**(F)** सदर प्रकारच्या कामासारखे याआधी कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय संस्थेस काम केल्याचे अनुभव दाखला जोडणे आवश्यक आहे.

**(G)** PTRC / PTEC Reg. Certificate स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक राहील.

**(H)** निविदेमध्ये सादर केलेली कागदपत्रे खरी असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट -१) रू.५०० च्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे बंधनकारक राहील.

**(I)** सर्व कामगारांना सुरक्षाविषयी (गनबूट, मास्क, जॅकेट, हॅन्डग्लोज ई.) साहित्य पुरविणे बाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६) वरील **(A ते I)** कुठलेही कागदपत्रे सादर केलेले नसल्यास सदरची निविदा रद्द करण्यात येईल.

७) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. तसेच सदर कागदपत्रांच्या मूळ प्रती स्कॅन करून अपलोड कराव्यात सत्यप्रत किंवा साक्षांकित प्रत ग्राह्य धरली जाणार नाही. मूळ प्रत उपलोड केलेली नसल्यास सदर निविदाधारकाची निविदा रद्द करण्यात येईल व त्याचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही.

८) निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

ग्रामपंचायत कुरुळी
जा.क्र.
दि.
तालुका-खेड, जिल्हा-पुणे.

९) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा) दि22/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता www.Mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड जिल्हा पुणे येथे उघडण्यात येईल. तांत्रिक लिफापा क्र.१ मधील आवश्यक कागद पात्रांची सूची नसेल तर लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही.

१०) पात्र निविदा धारकांच्या दराचा लिफाफा क्र.२ उघड्णेचा वेळ संबंधित पुरवठादारास ई-मे ल द्वारे. कळविला जाईल.

**लिफाफा क्र.२ (व्यापारी लिफाफा)**

अ. ई – निविदे सोबत जोडलेल्या BOQ File मध्ये निविदा धारकाचे नाव व दर नमूद असावा.

आ. निविदाधारकाने BOQ File मध्ये GST रक्कम स्वतंत्रपणे नमूद करावी.

११) मंजूर निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम कामाचा करारनामा करतेवेळी **"ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जिल्हा पुणे"** येथे देय असलेल्या एफ डी आर स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित रक्कम देयकातून कपात केली जाईल.

१२) ग्रामपंचायत कार्यालयाकडून पुरवठा आदेश मिळाल्यानंतर सदरचे काम प्रपत्र ब (Schedule-B) मध्ये दिलेल्या स्पेसिफिकेषण प्रमाणे करणे बंधनकारक राहील.

१३) कामगारांना हातमोजे, गनबूट, सुरक्षा मास्क इत्यादी साधने पुरवण्याची जबाबदारी व काम करीत असताना कामगारांना होणाऱ्या अपघाताची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. व त्याचा संपूर्ण खर्च हा कंत्राटदाराला करावा लागेल. अशा कोणत्याही प्रकारचा खर्च ग्रामपंचायतीने अदा करण्यात येणार नाही त्याची सर्वस्वी जबाबदारी हि कंत्राटदाराची राहील.

१४) काम करणाऱ्या सर्व कामगारांचा स्वखर्चाने विमा उतरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील त्याकरिता ग्रामपंचायत कडून कुठल्याही प्रकारची अतिरिक्त रक्कम अदा करणात येणार नाही.

१५) सदर कामाचा कालावधी हा एक वर्षाकरिता आहे. परंतु काही कारणास्तव सदर कालावधी कमी करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कुरुळी यांचेकडे राहतील.

१६) सदर काम केल्यानंतर ग्रामपंचायतकडे निधी उपलब्ध नसल्यास निधी उपलब्धतेनुसार पुरवठादारास देयके अदा केले जातील.

१७) कोणतेही कारण न देता कोणतीही एक निविदा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा हक्क ग्रामपंचायत कुरुळी यांनी राखून ठेवला आहे.

१८) निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना, शुधीपत्रक अथवा इतर माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१९) सदर निविदा प्रक्रियेमध्ये कायदेशीर वाद विवाद उपस्थित झाल्यास त्याबाबतचे कार्यक्षेत्र हे राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे न्यायालय राहील.

S.V. Sonawane

XXX

प्रशासक / ग्रामपंचायत अधिकारी

ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जि.पुणे

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कुरुळी
ता. खेड, जि. पुणे

प्रशासक
ग्रामपंचायत कुरुळी
ता. खेड, जि. पुणे

Signature Not Verified
Digitally signed by BALU BABAN MALGHE
Date: 2026.05.13 13:10:12 IST
Location: Maharashtra-MH